# IRB India's biggest BOT

| Pub Date: | 19 Aug 2016 | Publication: | Sanj Vartha | Edition: | Pune |
|---|---|---|---|---|---|
| Journalist: | Bureau | Language: | Marathi | Page No.: | 1 |
| CCM: | 32.85 | MAV: | 16423.9 | Circulation | 12000 |



## आयआरबी भारतातील सर्वात मोठी बीओटी

**मुंबइ :** आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेड ('आयआरबी), ही भारतातील सर्वात मोठी बीओटी तत्वावर रस्तानिर्मिती करणारी कंपनी आहे. त्यांनी ३० जून २०१६ रोजी संपलेल्या तिमाही वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणापूर्वीचे परिणाम जाहीर केले.

**या परिणामाचे अधोरेखित मुद्दे:**

आर्थिक वर्ष १६ ची पहिली तिमाही विरुद्ध आर्थिक वर्ष १५ ची पहिली तिमाही:

आयआरबीने आर्थिक वर्ष १७ च्या पहिल्या तिमाहीत झालेल्या रू.१,५४८ कोटींच्या एकूण उत्पन्नावर रू.१८२ कोटींचा नफा घोषित केला.आर्थिक वर्ष १७ च्या पहिल्या तिमाहीत झालेल्या व्यवहारात ३७% ची वाढ दिसली. आर्थिक वर्ष १६ च्या पहिल्या तिमाहीत रू. १,१०९ कोटींची नोंद झाली होती.

आयआरबी कन्स्ट्रशन ऑर्डर बुक आता सुमारे रू. ८,७५० कोटीच्या घरात उभे आहे. त्यामुळे येत्या वर्षांमध्ये आयआरबीला चांगली महसूल दृश्यता (रेव्हेन्यू व्हिजिबलीटी) मिळेल.

**आयआरबी**

आयआरबी ही एक अत्याधुनिक पायाभूत विकास आणि बांधणी कंपनी आहे. आयआरबीचे टोल वसुली करणारे रस्ते आणि महामार्ग क्षेत्रात महत्त्वाचे अस्तित्व आहे. हा भारतातला एक सर्वात मोठा खासगी निर्मितीदार मानण्यात येतो. त्यांच्याकडे सुमारे २० रस्ते बीओटी प्रकल्प असून त्यापैकी १३ प्रकल्प कार्यरत आहेत. २५ फेब्रुवारी २००८ पासून आयआरबी एनएसई आणि बीएसईमध्ये लिस्टींग मिळवलेली कंपनी आहे. या संदर्भातील अधिक माहितीसाठी लॉग ऑन करा. www.irb.co.in.